# ५. दोन दिवस

भाग २

**नारायण सुर्वे** (१९२६ ते २०१०) :

प्रथितयश कवी. 'ऐसा गा मी ब्रह्म', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'सनद', 'नव्या माणसाचे आगमन' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. स्वत:च्या प्रकृतीशी जुळणारी, निवेदनात्मक, संवादाचा वापर प्रभावीपणे करणारी, बोलीभाषेशी जवळीक असणारी, गद्याच्या अंगाने जाणारी विशिष्ट शैली सुर्वे यांनी निर्माण केली. कामगार जीवनाची सुखदु:खे त्यांच्या काव्यलेखनाच्या प्रेरणास्थानी असतात. माणसावरील अपार श्रद्धेतून त्यांची कविता साकारली आहे.

या कवितेतून 'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले' असे जीवनाचे वास्तव चित्र रेखाटताना 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली' असे भीषण जीवनसत्य कवीने मांडले आहे; पण हे सत्य मांडताना जगाच्या या शाळेत दु:ख पचवून जगण्याची शिकवण आपल्याला मिळाल्याचे ते सूचित करतात.

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

(ऐसा गा मी ब्रह्म!)

**शब्दार्थ :**

**बरबाद होणे** – वाया जाणे.
**हरघडी** – प्रत्येक वेळी.
**शेकणे** – तापणे.

## कृती

### (१) कृती पूर्ण करा.

(अ) 'रोजची भूक भागवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांमुळे आयुष्याचे दिवस वाया गेलेत' या आशयाची कवितेतील ओळ शोधा.

(आ) कवीचा प्रयत्नवाद आणि आशावाद दाखवणारी ओळ लिहा.

### (२) एका शब्दांत उत्तर लिहा.

(अ) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट ________

(आ) कवीचा जवळचा मित्र ________

### (३) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

(अ) माना उंचावलेले हात ________

(आ) कलम केलेले हात ________

(इ) दारिद्र्याकडे गहाण पडलेले हात ________

### (४) काव्यसौंदर्य.

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.
'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे'

(आ) 'दु:ख पेलावे आणि पुन्हा जगावे', या वाक्यामागील तुम्हांला जाणवलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(इ) कवितेत व्यक्त झालेल्या कष्टकऱ्यांच्या जीवनाविषयी तुमच्या भावना लिहा.

(ई) 'कवितेत व्यक्त झालेले जीवनसत्य', याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

❖ ❖ ❖

9XKPH4